# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## वैद्यकिय मुख्य कार्यालय

### सभावृत्तांत

दिनांक : २८/०१/२०२० वेळ : दु. ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वैद्यकिय मुख्य कार्यालयांतर्गत धन्वंतरी स्वास्थ्य योजनेची समिती बैठक मा.अति. आयुक्त (१) यांचे दालनात मंगळवार, दिनांक २८/०१/२०२० रोजी दु.११.३० वा. बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी महासंघ यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

१) श्री.संतोष पाटील, अति.आयुक्त (१) तथा उपाध्यक्ष

२) श्री.आमोद कुंभोजकर, मुख्य लेखा परिक्षक

३) श्री.जितेंद्र कोळंबे, मुख्य लेखा अधिकारी

४) डॉ.पवन साळवे, अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी

५) श्री.मनोज लोणकर, सहा.आयुक्त (प्रशासन)

६) श्री.अंबर चिंचवडे, अध्यक्ष,पिंपरी चिंचवड म.न.पा. कर्मचारी महासंघ

| अ.क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| १ | कै.अनिल वसंत थेऊरकर, मुख्य लिपीक यांचे यकृत प्रत्यारोपण व मेंदूच्या शस्त्रक्रिया बीलांचे प्रतिपुर्तीबाबत निर्णयार्थ. | कै.अनिल वसंत थेऊरकर, मुख्य लिपीक यांचे यकृत प्रत्यारोपण व मेंदूच्या शस्त्रक्रियेचे बिल धन्वंतरी कक्षात अद्याप सादर केले नाही. बिल सादर केलेनंतर समिती मार्फत निर्णय घेणेत येईल. |
| २ | श्री.सुभाष जवळगे यांचे पत्नीचे लिवर सिरॉसीसमुळे यकृत प्रत्यारोपण करणेकामी आदित्य बिर्ला रुग्णालयाकडून मंजुरी कामी Estimate व Approval मागितले आहे. निर्णयार्थ. | श्री.सुभाष जवळगे यांचे पत्नीचे (Trans jugular liver biopsy) या शस्त्रक्रियेसाठी चे र.रु. २५,०००/- इतक्या रक्कमेचे बिल देणेस समितीने मान्यता दिलेली आहे. तथापी liver transplant ही शस्त्रक्रिया धन्वंतरी योजने अंतर्गत देय नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री.रघुनाथ दादासाहेब कुंभार, सहा.शिक्षक यांचा मुलगा कु.सौरभ रघुनाथ कुंभार याची जन्म दि.०६/०७/१९९४ अशी असून दि.०६/०७/२०१९ रोजी वयाला २५ वर्षे पुर्ण झाली आहेत. कु.सौरभ याला १४ वर्षापासून फीटचा त्रास असल्याने त्याला दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करणेस सांगितले आहे. तथापि त्याला यापुर्वी धन्वंतरी योजनेतून उपचार चालू होते. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल येथील डिसचार्ज समरी व रिपोर्ट सोबत जोडले आहे. त्याचे उपचारासाठी विनंती अर्ज सादर केला आहे.निर्णयार्थ. | श्री.रघुनाथ दादासाहेब कुंभार, सहा.शिक्षक यांना त्यांचा मुलगा कु.सौरभ रघुनाथ कुंभार याचे दिव्यांग असले बाबतचे शासकिय रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करणे बाबत कळविले असून त्यानंतर यथायोग्य निर्णय घेणेत येईल. |
| ४ | श्री.संजय सर्जेराव गायकवाड, शिपाई यांची मुलगी कु.प्रिती संजय गायकवाड हिची जन्म दि.३१/०१/१९९५ अशी असून दि.३१/०१/२०२० रोजी वयाला २५ वर्षे पुर्ण होत आहेत. कु.प्रिती हिला Multiple Sclerosis of Brain हा आजार असून तिला डॉ.सतिश नि-हाळे यांचेमार्फत डॉ.नास्ली इचोपारिया (जहांगीर व सह्याद्री हॉस्पिटल) यांचेकडे उपचार चालू आहेत. तिला २५ वर्ष पुर्ण होत असून त्यांनी उपचारासंबधीत कागदपत्रे, डिसचार्ज समरी व रिपोर्ट सोबत जोडले आहे. तिचे उपचारासाठी विनंती अर्ज सादर केला आहे. निर्णयार्थ. | श्री.संजय सर्जेराव गायकवाड, शिपाई यांना त्यांची मुलगी कु.प्रिती संजय गायकवाड हिचे दिव्यांग असले बाबतचे शासकिय रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करणे बाबत कळविले असून त्यानंतर यथायोग्य निर्णय घेणेत येईल. |
| ५ | श्री.शहाजी बापु बोत्रे यांचा मुलगा कर्णबधिर अपंग असून त्याला कायमस्वरुपी धन्वंतरी योजनेत नाव समाविष्ट करणेत यावे यासाठी विनंती अर्ज केला आहे. निर्णयार्थ. | श्री.शहाजी बापु बोत्रे यांनी त्यांच्या मुलाचे दिव्यांग असले बाबतचे शासकिय रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर केलेले असून त्यात श्री.बोत्रे यांचा मुलगा १००% कर्णबधिर असलेचे नमुद केले असून त्यामुळे त्यांच्या मुलाचे नाव कायमस्वरुपी धन्वंतरी स्वास्थ योजनेमध्ये समाविष्ट करणेस समितीने मान्यता दिलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीची दि.२९/०९/२०१५ रोजीच्या सभेत शिक्षण मंडळातील सेवेतील शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक यांचे स्वहिस्सा कपाती बाबत अनुक्रमे ६०० व ३०० रुपये स्वहिस्सा ठरविला होता. त्यांना विमा लागु करताना स्वहिस्सा निश्चित करणेत यावा. निर्णयार्थ. | शिक्षण मंडळातील सेवेतील शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक यांचा मागील ५ वर्षांचा वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठी किती खर्च झालेला आहे याची शिक्षण मंडळाकडून माहिती घेणे तसेच यासंबंधी शासन धोरण काय आहे त्यानुसार शिक्षण मंडळाने शासन मान्यतेकामी पत्रव्यवहार करणेत यावा व त्यानंतर चर्चा करून त्यावर योग्यतो निर्णय घेणेत येईल. |
| ७ | श्री.दिलीप अनंत करंजखेले, (अन्न) पर्यवेक्षक वर्ग (२) यांचेकडील दि.२०/०६/२०१९ व श्री.रविंद्र गोविंद नागवेकर, अन्ननिरिक्षक यांचेकडील दि.१६/१२/२०१९ रोजीचे अर्जान्वये धन्वंतरी योजनेत सामावून घेणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे. याबाबत निर्णयार्थ. | प्रशासन विभागाचा अभिप्राय घेणेत यावा व त्यानंतर योग्य तो निर्णय घेणेत येईल. |

आमोद कुंभोजकर
मुख्य लेखापरिक्षक
तथा सदस्य

जितेंद्र कोळंबे
मुख्य लेखा अधिकारी
तथा सदस्य

मनोज लोणकर
सहा.आयुक्त (प्रशा.)
तथा सदस्य

अंबर चिचवडे
अध्यक्ष, कर्मचारी महासंघ
तथा उपाध्यक्ष

संतोष पाटील
अति.आयुक्त (१)

डॉ.पवन साळवे
अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी

06.02